# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी
महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.
दुरध्वनी क्र. 28192828/28193087.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.मनपा/आस्था/1024/2022-23 दि.01/08/2022

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील कार्यरत कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) यांना शाखा अभियंता (स्थापत्य) या पदावर पदोन्नती देणेबाबत.

संदर्भ :-
1. जा.क्र.मनपा/सा.प्र./1489/2015, दि.16/12/2015 रोजीचा आदेश.
2. नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक - मिभाम-1116/प्र.क्र.36 (भाग-1)/16/नवि-28, दि.26/02/2019.
3. नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक -मिभाम-1116/प्र.क्र.35/16/नवि-28, दि.28/05/2019.
4. सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :- एसआरव्ही 2018/प्र.क्र.159/कार्यासन 12, दि. 01/08/2019.
5. सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्र.बीसीसी 2018/प्र.क्र.366/16-ब, दि.07 मे 2021.
6. नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील क्रमांक मिभाम-1116/प्र.क्र.35/नवि-28, दि.25 नोव्हेंबर,2021.
7. मा.विभागीय पदोन्नती निवड समितीच्या बैठकीचे इतिवृत्तांत दि.01/08/2022.

## आदेश

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या संवर्गातील कर्मचारी यांना पदोन्नती देणेबाबत संदर्भ क्र.07 नुसार पदोन्नती समितीने शिफारस केली आहे. त्यानुसार उपरोक्त संदर्भ क्र.02 ते 06 वरील शासन निर्णयास अनुसरुन कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या संवर्गातील खालील कर्मचारी यांना सेवाजेष्ठतेनुसार खुल्या प्रवर्गात निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात खालील अटीशर्तीच्या अधिन राहून आदेशाच्या दिनांकापासुन पदोन्नती देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव व वेतनश्रेणी | सद्याचे पद | पदोन्नतीचे पद | नेमणूक प्रवर्ग | पदोन्नतीच्या पदाची वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| 1. | श्री.चेतन म्हात्रे<br>S-13 35400-112400 | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | शाखा अभियंता (स्थापत्य) | खुला | S-15 41800-132300 |

अटीशर्ती :-

1. मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका क्रमांक 28306/2017 तसेच दि.07/05/2021 च्या शासन निर्णयाप्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुबंई येथे दाखल केलेल्या याचिकेवरील अंतिम निर्णयाच्या अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत आहे.
2. सदर पदोन्नती मा.महासभेच्या मान्यतेच्या अधिन राहून देण्यात येत आहे.
3. पदोन्नत अधिकाऱ्याने पदोन्नती नाकारल्यास शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, एसआरव्ही-2015/प्र.क्र.303/कार्या-12, दि.12/09/2016 मधील तरतुदींनुसार कार्यवाही करण्यात येईल.
4. सदर पदोन्नती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने या तात्पुरत्या पदोन्नतीच्या परिणामी निवडसूचीतील अधिकारी/कर्मचाऱ्यांना नियमीतपणाचा कोणताही हक्क मिळणार नाही.
5. सद्य:स्थितीत कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या पदाच्या ज्येष्ठता यादीबाबत कोणतेही न्यायालयीन प्रकरण प्रलंबित नाही तसेच या ज्येष्ठता यादीस आव्हानित देखील करण्यात आलेले नाही ही वस्तुस्थिती विचारात घेऊन पदोन्नती देण्यात येत आहे.
6. शाखा अभियंता (स्थापत्य) या पदावरील पदोन्नती ही त्यांच्या विरुध्द प्रस्तुत आदेशाच्या दिनांकापर्यंत कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी सुरू झालेली नाही वा प्रस्तावित नाही या धारणेच्या अधिन राहून देण्यात येत आहे.
7. उपरोक्त नमुद कर्मचाऱ्यांनी पदोन्नतीने नियुक्तीचे आदेश प्राप्त होताच 07 दिवसात अथवा निम्नस्वाक्षरीत मंजूर करतील अशा वाढीव मुदतीत पदोन्नतीच्या पदावर हजर व्हावे. तसेच पदभार स्विकारुन त्याबाबतचा अहवाल प्रशासनास तात्काळ सादर करावा. त्याचप्रमाणे विहित मुदतीत पदोन्नतीच्या पदावर हजर न

झाल्यास अथवा पदोन्नती न स्विकारल्यास पदोन्नती आपोआप रद्द होईल. तसेच सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :- एसआरव्ही-1087/1131/प्र.क्र.11-89/बारा, दि.30 एप्रिल, 1991 मधील तरतुदीनुसार त्यांचे नाव निवडयादीतून काढून टाकण्यात येईल.

8. कनिष्ठ अभियंता यांना आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिका सेवा (सेवाभरती व सेवांचे वर्गीकरण) नियम, 2014 नुसार उप-अभियंता या पदाच्या वेतनश्रेणीचा लाभ देण्यात आलेला आहे. अशा कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, 1981 मधील नियम 9(41) तसेच नियम 11(2)(ब) नुसार वेतननिश्चिती करण्यात येईल.
9. या आदेशान्वये पदोन्नती देण्यात येत असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांनी पदग्रहण केल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत वेतननिश्चितीचा विकल्प द्यावा. असा विकल्प न दिल्यास महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम,1981 मधील नियम 11(1)(ए) व महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम, 2009 मधील नियम 13(अ)(1)(2)(ब) (1 व 2) नुसार पदोन्नतीचा दिनांक विचारात घेऊन त्यांची वेतननिश्चिती करण्यात येईल.
10. यासंदर्भात कोणताही शासन निर्णय/परिपत्रक/आदेश/कायदा/मा.न्यायालयीन आदेश/नियमातील सुधारणा इत्यादीमुळे आवश्यक असतील त्याबाबतीत सदर आदेश रद्द करणे/सुधारीत आदेश काढणे याबाबतचे अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांचेकडे राखुन ठेवण्यात येत आहेत.

(दिलीप ढोले)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत :- माहितीस्तव तथा पुढील कार्यवाहीस्त्व

1. अतिरिक्त आयुक्त (1/2)
2. उपायुक्त (सर्व)
3. मुख्यलेखापरीक्षक
4. मुख्यलेखाधिकारी
5. संबंधीत विभागप्रमुख/कार्यालय प्रमुख
6. संबंधितांस
7. आस्थापना निवडनस्ती

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## "मा. विभागीय पदोन्नती निवड समिती" बैठक दि.01/08/2022 रोजीचे इतिवृत्तांत"

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) (गट-क) (वेतनश्रेणी S-13 35400-112400) या संवर्गातील पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना शाखा अभियंता (स्थापत्य) (गट-ब) (वेतनश्रेणी S-15 41800-132300) या संवर्गातील पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 54 (1) अन्वये गठीत केलेल्या पदोन्नती निवड समितीची बैठक दि.01/08/2022 रोजी दुपारी 12.30 वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्यालय, दुसरा मजला येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालीलप्रमाणे अधिकारी/पदाधिकारी उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. दिलीप ढोले | आयुक्त तथा अध्यक्ष, |
| 2. | श्री. मारुती गायकवाड | उपायुक्त (मुख्यालय) तथा सदस्य सचिव, |
| 3. | श्रीम.मंजिरी डिमेलो | प्र.मुख्यलेखापरीक्षक तथा सदस्य, |
| 4. | श्री. दिपक खांबीत | कार्यकारी अभियंता तथा मागासवर्गीय प्रतिनिधी, |

| | | | |
|---|---|---|---|
| (मारुती गायकवाड) | (दिपक खांबीत) | (मंजिरी डिमेलो) | (दिलीप ढोले) |
| उपायुक्त (मुख्यालय) तथा सदस्य सचिव<br>विभागीय पदोन्नती निवड समिती | कार्यकारी अभियंता तथा मागासवर्गीय प्रतिनिधी<br>विभागीय पदोन्नती निवड समिती | प्र.मुख्यलेखापरीक्षक तथा सदस्य<br>विभागीय पदोन्नती निवड समिती | आयुक्त तथा अध्यक्ष<br>विभागीय पदोन्नती निवड समिती |

**<u>आस्थापना विभागाने सादर केलेला प्रस्ताव :-</u>**

नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :- मिभाम-1116/प्र.क्र.36(भाग-1)/16/नवि-28, दि. 26 फेब्रुवारी, 2019 नुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेतील विभागांकरीता विविध संवर्गातील पदे निर्माण करण्यास व महानगरपालिकेच्या आकृतीबंधास मान्यता प्राप्त झाली आहे. तसेच नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :- मिभाम-1116/प्र.क्र.35/16/नवि-28, दि. 28 मे, 2019 व नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील क्रमांक मिभाम-1116/प्र.क्र.35/नवि-28, दि.25 नोव्हेंबर,2021 अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम- 2019 च्या सुधारणेस मान्यता दिल्यानुसार शाखा अभियंता (स्थापत्य) (गट-ब) या संवर्गात पदोन्नतीकरीता खालीलप्रमाणे अर्हता विहित करण्यात आली आहे.

| सेवा व संवर्ग | पदनाम | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी<br>1. नामनिर्देशन<br>2. पदोन्नती<br>3. प्रतिनियुक्ती | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती |
|---|---|---|---|
| श्रेणी - 02<br>अभियांत्रिकी सेवा | शाखा<br>अभियंता<br>(स्थापत्य) | पदोन्नती 100% | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या पदावर किमान 03 वर्षाची सेवा पूर्ण झालेल्या व कनिष्ठ अभियंता व्यवसायिक परीक्षा उत्तीर्ण असलेल्या कर्मचाऱ्यांची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |

मिरा भाईंदर महानगरपालिका आकृतीबंधानुसार शाखा अभियंता (स्थापत्य) या संवर्गातील एकुण 16 पदे मंजूर आहे व मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम- 2019 नुसार शाखा अभियंता (स्थापत्य) (गट-अ) चे एकुण 16 पद हे 100% पदोन्नतीने भरावयाचे आहे. सद्यस्थितीत 10 शाखा अभियंता (स्थापत्य) कार्यरत आहेत. त्यामुळे 06 रिक्त असलेल्या पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्याचे प्रस्तावित आहे.

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :-एसआरव्ही-2018/प्र.क्र.159/कार्यासन-12, दि.01 ऑगस्ट,2019 नुसार शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नती देण्याकरीता अनुसरावयाच्या कार्यवाहीबाबतची एकत्रित मार्गदर्शक तत्वे विहित करण्यात आलेली आहेत. सदर शासन निर्णयातील मुद्दा क्र.उ(3) नुसार विचारक्षेत्रातील सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांची अ.क्र. i) ते Xiii) मधील निकषांच्या आधारे पात्रता तपासणेबाबत नमुद आहे.

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :बीसीसी 2018/प्र.क्र.366/16-ब, दि.07 मे, 2021 नुसार मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र.2797/2015 या प्रकरणी दि.04/08/2017 रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने व मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या या निर्णयास अद्याप स्थगिती दिलेली नसल्याने पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दि.25/05/2004 च्या स्थितीनुसार सेवाजेष्ठतेने भरण्यात यावी असे निर्देश आहेत. तसेच सदर पदोन्नत्या निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात मा.सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्र.28306/2017 वरील अंतिम निर्णयाच्या अधिन असतील अशी कार्यवाही करताना पदोन्नतीमधील आरक्षणाचा लाभ घेऊन सध्याच्या सेवाजेष्ठता यादीत वरच्या स्थानावर आलेल्या कोणत्याही मागासवर्गीय अधिकारी/कर्मचाऱ्यांना पदावनत करण्यात येऊ नये असे निर्देश आहेत.

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.दिव्यांग 2015/प्र.क्र.171/16-अ, दि.23 जुलै, 2021 नुसार सर्व आस्थापनांनी गट-अ व गट-ब संवर्गातील पदोन्नतीबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दि.22/07/2021 रोजीच्या निर्णयानुसार दिव्यांग आरक्षणासह पदोन्नतीसाठीची सर्व रिक्त पदे (100%) भरण्याबाबत त्वरीत कार्यवाही करण्यात यावी. तसेच अशी कार्यवाही करताना मा.उच्च न्यायालयाच्या दि.22/07/2021 रोजीच्या आदेशाचा अवमान होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी, असे निर्देश आहेत.

| अ.क्र. | ज्येष्ठतेनुसार विचार क्षेत्रात येणाऱ्या अधिकाऱ्यांची जाती प्रवर्ग | ज्येष्ठतेनुसार विचारक्षेत्रातील प्रवर्गनिहाय अधिकाऱ्यांची नावे | ज्येष्ठता सूचीतील ज्येष्ठता क्रमांक | जन्म दिनांक व सध्याचे वय | सेवानिवृत्तीचा दिनांक | शैक्षणिक अर्हता | सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार पदोन्नती साठी अर्हता प्राप्त आहे/नाही | ज्या पदावरून पुढील पदावर पदोन्नती देय आहे त्या पदावर एकुण सेवा किती व केव्हापासून | सध्याच्या पदावर जेव्हापासून सलग काम करीत आहे तो दिनांक (त्या पदाचे नाव द्यावे) पदोन्नतीचा मानीव दिनांक दिला असल्यास तो नमूद करावा | वयाच्या 50/55 व्या वर्षी झालेल्या पुनर्विलोकनाचा निर्णय | जातीचे प्रमाणपत्राची वैधता प्राप्त झाली आहे किंवा कसे? | शिस्तभंग विषयक कार्यवाही/प्राथमिक चौकशी चालू आहे/नाही (विस्तृत माहिती जोडपत्र क मध्ये नमूद करावी) | पूर्वी कधीतरी आस्थापना मंडळाने त्यांचा विचार केला होता/नाही असल्यास आ.मं.च्या बैठकीचा दिनांक व सा.प्र.वि.चा संबंधीत पत्रव्यवहार नमूद करावा. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 1. | अनु.जमाती | श्री. सचिन लक्ष्मण पवार | 2 | 01/06/1978 43 वर्ष | 31/05/2036 | डी.सी.ई | आहे | 08/12/2003 पासुन (17 वर्ष) | 08/12/2003 पासुन कनिष्ठ अभियंता | लागु नाही | होय | जोडपत्र क सोबत जोडले आहे | मा.विभागीय पदोन्नती निवड समिती दि.31/03/2022 |
| 2. | अनु.जमाती | श्री. शैलेश शा. शिंदे | 5 | 28/06/1977 44 वर्ष | 30/06/2035 | डी.सी.ई | आहे | 16/04/2004 पासुन (17 वर्ष) | 16/04/2004 पासुन कनिष्ठ अभियंता | लागु नाही | होय | जोडपत्र क सोबत जोडले आहे | |
| 3. | खुला | श्री. यशवंतराव देशमुख | 7 | 30/07/1972 49 वर्ष | 31/07/2030 | डी.सी.ई | आहे | 26/08/2004 पासुन (17 वर्ष) | 26/08/2004 पासुन कनिष्ठ अभियंता | लागु नाही | लागु नाही | जोडपत्र क सोबत जोडले आहे | |
| 4. | भ.ज. | श्री. श्रीकृष्ण स. मोहिते | 9 | 23/07/1974 47 वर्ष | 31/07/2032 | डी.सी.ई | आहे | 26/08/2004 पासुन (17 वर्ष) | 26/08/2004 पासुन कनिष्ठ अभियंता | लागु नाही | होय | जोडपत्र क सोबत जोडले आहे | |
| 5. | खुला | श्री. चेतन बा. म्हात्रे | 13 | 13/05/1978 43 वर्ष | 31/05/2036 | बी.ई (सिव्हील) | आहे | 26/08/2004 पासुन (17 वर्ष) | 26/08/2004 पासुन कनिष्ठ अभियंता | लागु नाही | लागु नाही | जोडपत्र क सोबत जोडले आहे | |
| 6. | खुला | श्री. दिपक विठ्ठल जाधव | 16 | 05/03/1978 43 वर्ष | 31/03/2036 | बी.ई (सिव्हील) | आहे | 27/06/2007 पासुन (14 वर्ष) | 27/06/2007 पासुन कनिष्ठ अभियंता | लागु नाही | लागु नाही | जोडपत्र क सोबत जोडले आहे | |
| 7. | अनु.जाती | श्री. संदिप नारायणराव साळवे | 17 | 31/07/1978 43 वर्ष | 31/07/2036 | बी.ई (सिव्हील) | आहे | 31/03/2012 पासुन (15 वर्ष) | 31/03/2012 पासुन कनिष्ठ अभियंता | लागु नाही | आहे | जोडपत्र क सोबत जोडले आहे | |

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8. | अनु.जाती | श्री. प्रफुल्ल सुरेशराव वानखेडे | 18 | 04/11/1984 36 वर्ष | 30/11/2042 | बी.ई (सिव्हील) | आहे | 31/03/2012 पासुन (15 वर्ष) | 31/03/2012 पासुन कनिष्ठ अभियंता | लागु नाही | आहे | जोडपत्र क सोबत जोडले आहे | |
| 9. | खुला | श्री. विकास विष्णू परब | 19 | 24/01/1981 40 वर्ष | 31/05/2039 | बी.ई (सिव्हील) | आहे | 28/10/2005 पासुन (15 वर्ष) | 28/10/2005 पासुन कनिष्ठ अभियंता | लागु नाही | लागु नाही | जोडपत्र क सोबत जोडले आहे | |

➢ विचारक्षेत्रातील जे कर्मचारी मागासवर्गीय म्हणून नियुक्त झालेल्या खालील कर्मचाऱ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केले आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | जात पडताळणी आहे/नाही |
|---|---|---|
| 1. | श्री.सचिन लक्ष्मण पवार | आहे |
| 2. | श्री.शैलेश शिंदे | आहे |
| 3. | श्री.श्रीकृष्ण मोहिते | आहे |
| 4. | श्री.संदिप नारायणराव साळवे | आहे |
| 5. | श्री.प्रफुल्ल सुरेशराव वानखेडे | आहे |

➢ विचारक्षेत्रातील खालील कर्मचारी यांनी संगणक अर्हता प्रमाणपत्र सादर केले आहे

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव |
|---|---|---|---|
| 1. | श्री.सचिन लक्ष्मण पवार | 6. | श्री.दिपक विठ्ठल जाधव |
| 2. | श्री. शैलेश शा.शिंदे | 7. | श्री.संदिप नारायणराव साळवे |
| 3. | श्री.यशवंतराव देशमुख | 8. | श्री.प्रफुल्ल सुरेशराव वानखेडे |
| 4. | श्री.श्रीकृष्ण मोहिते | 9. | श्री.विकास विष्णू परब |
| 5. | श्री.चेतन बा.म्हात्रे | | |

➢ विचारक्षेत्रातील खालील कर्मचारी यांना जा.क्र.मनपा/आस्था/414/2019-20, दि.19/06/2019 रोजीच्या परिपत्रकान्वये विभागीय परिक्षा उत्तीर्ण होणेमधुन सुट देण्यात आली आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव |
|---|---|
| 1. | श्री.सचिन लक्ष्मण पवार |

| | |
|---|---|
| 2. | श्री. शैलेश शा.शिंदे |
| 3. | श्री.यशवंतराव देशमुख |
| 4. | श्री.श्रीकृष्ण मोहिते |
| 5. | श्री.चेतन बा.म्हात्रे |
| 6. | श्री.दिपक विठ्ठल जाधव |
| 7. | श्री.संदिप नारायणराव साळवे |
| 8. | श्री.प्रफुल्ल सुरेशराव वानखेडे |
| 9. | श्री.विकास विष्णू परब |

➢ विचारक्षेत्रातील खालील कर्मचाऱ्यांची परिविक्षाधीन कालावधीत नेमणूक केली असल्याने त्यांनी परिविक्षाधीन कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण केला असल्याने त्यांचा परिविक्षाधीन कालावधी जा.क्र.मनपा/आस्था/1585/2021-22, दि.13/12/2021 रोजीच्या आदेशान्वये समाप्त करण्यात आला आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव |
|---|---|
| 1. | श्री.सचिन पवार |
| 2. | श्री. शैलेश शामराव शिंदे |
| 3. | श्री.विकास विष्णू परब |
| 4. | श्री. संदिप नारायणराव साळवे |
| 5. | श्री.प्रफुल्ल वानखेडे |

➢ विचारक्षेत्रातील खालील कर्मचारी यांचेविरुध्द विभागीय चौकशी सुरु असल्याबाबत माहिती खालीलप्रमाणे -

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | विभागीय चौकशीबाबत माहिती |
|---|---|---|
| 1. | श्री. शैलेश शिंदे | मा.न्यायालयात लाचलुचपत प्रकरणी कार्यवाही चालु असून सद्यस्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. |
| 2. | श्री.यशवंतराव देशमुख | निलंबीत |
| 3. | श्री.श्रीकृष्ण मोहिते | निलंबीत |

➢ विचारक्षेत्रातील कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांपैकी श्री.सचिन पवार, कनिष्ठ अभियंता यांना मा.स्थायी समिती सभा दि.24/08/2018, ठराव क्र.59 अन्वये देण्यात आलेल्या शिक्षेनुसार कार्यवाही करणेस मंजुरी देण्यात आली आहे तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा,निलंबन इ.काळातील प्रदाने) नियम 1981 मधील

72(5) अन्वये त्यांना निलंबन कालावधीतील वेतन व भत्यांची 95% रक्कम मंजुर करण्यात आलेली आहे. सदरची रक्कम अदा करण्यापुर्वी त्यांना यापुर्वी देण्यात आलेली निर्वाह भत्याची 75% रक्कम समायोजित करण्यात आली आहे.

- विचारक्षेत्रातील कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांपैकी श्री.शैलेश शिंदे कनिष्ठ अभियंता यांना महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम 1979 मधील कलम 5(1)(चार) नुसार 01 वार्षिक वेतनवाढ भविष्यकालीन वेतनवाढीवर परिणाम होणार नाही अशारीतीने रोखण्याची शिक्षा फर्मावण्यात आली आहे.
- विचारक्षेत्रातील कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांपैकी श्री.शैलेश शिंदे कनिष्ठ अभियंता यांना महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम 1979 मधील कलम 5(1)(चार) नुसार पुढील 02 वार्षिक वेतनवाढ भविष्यकालीन वेतनवाढीवर परिणाम होईल अशारीतीने रोखण्याची शिक्षा फर्मावण्यात आली आहे.
- विचारक्षेत्रातील कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांपैकी श्री. शैलेश शिंदे, कनिष्ठ अभियंता यांचेवर ठेवण्यात आलेल्या एकुण 04 दोषारोपांपैकी 01 दोषारोप अंशत: सिध्द होत असल्याने महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम 1979 मधील नियम 5(1)(चार) नुसार व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 56(2)(ब) नुसार पुढील एक वार्षिक वेतनवाढ भविष्यकालीन वेतनवाढीवर परिणाम होणार नाही अशा रितीने रोखणेची शिक्षा फर्मावण्यात आलेली आहे.
- विचारक्षेत्रातील कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांपैकी श्री.संदिप साळवे, कनिष्ठ अभियंता यांना त्यांच्या निलंबन कालावधीत 80% वेतनाची रक्कम महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा,निलंबन इ.काळातील प्रदाने) नियम 1981 मधील नियम 72(5) मधील तरतुदीनुसार अदा करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. मात्र उक्त नियमातील नियम 68(1)(ए) अन्वये त्यांना यापूर्वी देण्यात आलेली निर्वाह भत्याची रक्कम समायोजित करुन उर्वरित रक्कम त्यांना अदा करण्यास मान्यता देण्यात आली आहे.
- आस्थापना मंडळाने पदोन्नतीसाठी यापूर्वी शिफारस केलेल्या अधिकाऱ्यांपैकी ज्या अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी/शिक्षा सुरु असलेली प्रकरणे मोहोरबंद पाकिटात ठेवण्यात आली असल्यास त्याचा तपशिल -

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव | आस्थापना मंडळाच्या शिफारशीबाबतचे पत्र क्रमांक व दिनांक | निवडसूची वर्ष |
|---|---|---|---|
| 1. | श्री. शैलेश शिंदे | मा. विभागीय पदोन्नती निवड समिती दि.31/03/2022 | 2021-22 |
| 2. | श्री.यशवंतराव देशमुख | | |
| 3. | श्री.श्रीकृष्ण मोहिते | | |
| 4. | श्री.चेतन म्हात्रे | | |
| 5. | श्री. दिपक जाधव | | |

- आस्थापना मंडळाने यापूर्वी माहिती प्राप्त न झाल्याच्या आधारे जी प्रकरणे खुली ठेवली आहेत त्याचा तपशिल :-

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव | आस्थापना मंडळाच्या शिफारशीबाबतचे पत्र क्रमांक व दिनांक | निवडसूची वर्ष |
|---|---|---|---|
| 1. | श्री. सचिन पवार | मा. विभागीय पदोन्नती निवड समिती दि.31/03/2022 | 2021-22 |

- आस्थापना मंडळाने पदोन्नतीसाठी यापूर्वी शिफारस केलेल्या अधिकाऱ्यांपैकी ज्या अधिकाऱ्यांना पदोन्नती देण्यात आली नाही किंवा नाकारली आहे त्यांचा तपशील :-

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव | आस्थापना मंडळाच्या शिफारशीबाबतचे पत्र क्रमांक व दिनांक | निवडसूची वर्ष | पदोन्नती न देण्यात आल्याचे/स्वत: नाकारण्याचे कारण |
|---|---|---|---|---|
| 1. | श्री. शैलेश शिंदे | मा. विभागीय पदोन्नती निवड समिती दि.31/03/2022 | 2021-22 | सदर कनिष्ठ अभियंता कर्मचारी यांचेविरुध्द विभागीय चौकशी सुरु/ सद्यस्थितीत निलंबीत तसेच मा.न्यायालयात प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामुळे त्यांची नावे दि.01/08/2019 रोजीच्या शासन निर्णयामधील उ) (6) नुसार मोहोरबंद पाकीटात ठेवण्यात आले होते. |
| 2. | श्री.यशवंतराव देशमुख | | | |
| 3. | श्री.श्रीकृष्ण मोहिते | | | |
| 4. | श्री.चेतन म्हात्रे | | | |
| 5. | श्री. दिपक जाधव | | | |

- विचारक्षेत्रातील कर्मचाऱ्यांपैकी कोणीही अपंग कर्मचारी नाही.
- विचारक्षेत्रातील खालील कनिष्ठ अभियंता कर्मचारी यांना जा.क्र मनपा/आस्था/828/2019-20, दि.31/08/2019 अन्वये स्थायित्व प्रमाणपत्र देण्यात आले आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव |
|---|---|
| 1. | श्री.सचिन लक्ष्मण पवार |
| 2. | श्री. शैलेश शा.शिंदे |
| 3. | श्री.यशवंतराव देशमुख |
| 4. | श्री.श्रीकृष्ण मोहिते |
| 5. | श्री.चेतन बा.म्हात्रे |
| 6. | श्री.दिपक विठ्ठल जाधव |
| 7. | श्री.संदिप नारायणराव साळवे |
| 8. | श्री.प्रफुल्ल सुरेशराव वानखेडे |
| 9. | श्री.विकास विष्णू परब |

- विचारक्षेत्रातील खालील कनिष्ठ अभियंता यांना जा.क्र.मनपा/आस्था/1088/2021-22 दि.11/08/2021 व जा.क्र. मनपा/आस्था/1089/2021-22 दि.11/08/2021 अन्वये हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सुट देण्यात आली आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव |
|---|---|---|---|
| 1. | श्री. शैलेश शा. शिंदे | 5. | श्री.दिपक विठ्ठल जाधव |

| | | | |
|---|---|---|---|
| 2. | श्री.यशवंतराव देशमुख | 6. | श्री.संदिप नारायणराव साळवे |
| 3. | श्री.श्रीकृष्ण मोहिते | 7. | श्री.प्रफुल्ल सुरेशराव वानखेडे |
| 4. | श्री श्री.चेतन बा.म्हात्रे | 8. | श्री.विकास विष्णू परब |

➢ विचारक्षेत्रातील खालील कनिष्ठ अभियंता यांनी एतदर्थ मंडळाच्या हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण केली नसल्याने त्यांना शाखा अभियंता (स्थापत्य) या पदावर पदोन्नती देण्यासाठी सद्यस्थितीत विचार करता येणार नाही.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव |
|---|---|
| 1. | श्री.सचिन लक्ष्मण पवार |

➢ विचारक्षेत्रातील कनिष्ठ अभियंता कर्मचारी यांना जा.क्र मनपा/आस्था/1130/2021-22, दि.18/08/2021 व जा.क्र मनपा/आस्था/1162/2021-22, दि.24/08/2021 अन्वये मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासुन सुट देण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव |
|---|---|
| 1. | श्री.सचिन लक्ष्मण पवार |
| 2. | श्री. शैलेश शा.शिंदे |
| 3. | श्री.यशवंतराव देशमुख |
| 4. | श्री.श्रीकृष्ण मोहिते |
| 5. | श्री.चेतन बा.म्हात्रे |
| 6. | श्री.दिपक विठ्ठल जाधव |
| 7. | श्री.संदिप नारायणराव साळवे |
| 8. | श्री.प्रफुल्ल सुरेशराव वानखेडे |
| 9. | श्री.विकास विष्णू परब |

➢ मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील शांती नगर वसाहतीतील पाणी वितरण व्यवस्था मनपाकडे हस्तांतरीत करताना सदर योजनेतील 69 कर्मचाऱ्यांना मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील रिक्त पदावर नियुक्ती करण्याबाबतचे दि.27/06/2007 रोजीचे आदेश रद्द करण्यात यावेत व सदरची नियुक्ती प्रक्रिया करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी. तसेच दि.18/02/2006 व दि.21/08/2006 रोजी दैनिक सकाळ वर्तमानपत्रात मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर सफाई कामगार/रखवालदार/मजुर या पदासाठी करावयाच्या भरतीबाबत प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीबाबतची रद्द करण्यात आलेली भरती प्रक्रिया पुर्ण करणेबाबत मनपास आदेशित करण्यात यावे म्हणून याचिकेदार श्री. जयेश दयाराम भोईर व इतर यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे

रिट याचिका नं. 3277/2018 दाखल केली होती. सदर याचिका मा. उच्च न्यायालयाने दि.18/06/2012 रोजी मान्य करुन निकाली काढली असता सदर निर्णयाविरुध्द मनपा कर्मचारी श्री. दिपक जाधव व इतर यांनी मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे SLP (C) No.21955-2012 दाखल केलेली आहे. सदरची याचिका सिव्हिल अपिलमध्ये convert झालेली असून सदर अपिलाचा निकाल लागेपर्यंत सदर प्रकरणी जैसे थे स्थिती ठेवण्यास मा. सर्वोच्च न्यायालयाने आदेशित केलेले असून सदर अपिल अद्यापपर्यंत प्रलंबित आहे. त्यामुळे श्री. दिपक जाधव यांना मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे SLP (C) No.21955-2012 दाखल केलेल्या याचिकेच्या अंतिम निर्णय पारीत झाल्या नंतर पदोन्नती देण्याची कार्यवाही करणे योग्य आहे. त्यामुळे श्री. दिपक जाधव यांना सद्यस्थितीत पदोन्नती देण्यासाठी विचार करता येणार नाही.

- विचारक्षेत्रातील ज्या कनिष्ठ अभियंता यांना आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिका सेवा (सेवाभरती व सेवांचे वर्गीकरण) नियम, 2014 नुसार उप-अभियंता या पदाच्या वेतनश्रेणीचा लाभ देण्यात आलेला आहे. अशा कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, 1981 मधील नियम 9(41) तसेच नियम 11(2)(ब) नुसार वेतननिश्चिती करणे आवश्यक आहे.
- विचारक्षेत्रातील खालील कनिष्ठ अभियंता या संवर्गाची सन 2020 च्या अंतिम सेवा ज्येष्ठता यादीनुसार ज्येष्ठता क्रम खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | ज्येष्ठता क्रमांक | कर्मचाऱ्याचे नाव | अभिप्राय |
|---|---|---|---|
| 1. | 2 | श्री. सचिन लक्ष्मण पवार | |
| 2. | 5 | श्री. शैलेश शिंदे | |
| 3. | 7 | श्री. यशवंतराव देशमुख | |
| 4. | 9 | श्री. श्रीकृष्ण मोहिते | |
| 5. | 13 | श्री. चेतन म्हात्रे | |
| 6. | 16 | श्री. दिपक विठ्ठल जाधव | |
| 7. | 17 | श्री. संदिप साळवे | |
| 8. | 18 | श्री. प्रफुल्ल वानखेडे | |
| 9. | 19 | श्री. विकास विष्णु परब | |

- मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.28306/2017 च्या अधिन राहुन सामान्य प्रशासन विभाग (का.16-ब), शासन निर्णय दि.07/05/2021 मधील तरतुदीनुसार पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाजेष्ठतेनुसार मा.सर्वोच्य न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहुन तात्पुरती पदोन्नती देण्यात यावी. असे निर्देश असल्याने कनिष्ठ अभियंता या संवर्गाची सन 2004 च्या अंतिम सेवा ज्येष्ठता यादीनुसार निवडसुची खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | ज्येष्ठता क्रमांक | कर्मचाऱ्याचे नाव |
|---|---|---|
| 1. | 5 | श्री. सचिन लक्ष्मण पवार |

- विचारक्षेत्रातील खालील कनिष्ठ अभियंता कर्मचारी यांनी मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम-2019 नुसार शाखा अभियंता (स्थापत्य) या पदावर पदोन्नती देण्यासाठी कनिष्ठ अभियंता या पदाचा 03 वर्षाचा अनुभव धारण केलेला आहे तसेच विभागीय परिक्षा उत्तीर्ण होणेमधुन सुट देण्यात आली आहे. परंतू खालील कनिष्ठ अभियंता कर्मचारी यांचेविरुध्द विभागीय चौकशी सुरु/सद्यस्थितीत निलंबीत असल्यामुळे त्यांची नावे दि.01/08/2019 रोजीच्या शासन निर्णयानुसार मोहोरबंद पाकीटात ठेवणेस शिफारस आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | विभागीय चौकशीबाबत माहिती |
|---|---|---|
| 1. | श्री.शैलेश शिदे | मा.न्यायालयात लाचलुचपत प्रकरणी कार्यवाही चालु असून सद्यस्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. |
| 2. | श्री.यशवंतराव देशमुख | निलंबीत |
| 3. | श्री.श्रीकृष्ण मोहिते | निलंबीत |
| 4. | श्री.दिपक विठ्ठल जाधव | श्री. दिपक जाधव यांच्या नेमणूकीबाबत मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे स्पेशल लिव्ह क्र.21955/2012 दाखल केलेले आहे. सद्यस्थितीत सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. |

- तसेच विचारक्षेत्रातील कनिष्ठ अभियंता कर्मचाऱ्यांपैकी खालील कनिष्ठ अभियंता हे पदोन्नतीसाठी पात्र असून, केवळ एतदर्थ मंडळाच्या हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण नसल्यामुळे त्यांना हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासुन सुट दिलेली नाही. त्यामुळे खालील कनिष्ठ अभियंता यांचेकरीता पदोन्नतीसाठी पद राखुन ठेवुन प्रकरण खुले ठेवणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | शेरा |
|---|---|---|
| 1. | श्री. सचिन पवार | हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण नाही. |

- सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्रमांक :- बीसीसी-2018/प्र.क्र.366/16-ब, दि.07 मे, 2021 अन्वये मा. उच्च, मुंबई यांनी याचिका क्र.2797/2015 या प्रकरणी दिनांक 04/08/2017 रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने व मा. सर्वोच्च न्यायालयाने मा. उच्च न्यायालयाच्या या निर्णयास अद्याप स्थागिती दिलेली नसल्याने पदोन्नतीच्या कोट्यातील सर्व रिक्त पदे दि.25/05/2004 च्या स्थितीनुसार सेवा ज्येष्ठतेने भरण्याबाबत निर्देश आहेत. त्याअनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील शाखा अभियंता (स्थापत्य) या पदाची 06 रिक्त पदे पदोन्नतीने भरावयाची असल्यामुळे खालील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) यांनी शाखा अभियंता (स्थापत्य) या पदावर पदोन्नती देण्यासाठी कनिष्ठ अभियंता या पदाचा 03 वर्षाचा अनुभव धारण केलेला आहे व व्यवसायिक परीक्षा उत्तीर्ण होण्यापासुन सुट देण्यात आली आहे. त्यामुळे खालील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) यांना मा.महासभा मान्यतेच्या अधिन राहून व मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.28306/2017 च्या अधिन राहुन निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात शाखा अभियंता (स्थापत्य) या पदावर पदोन्नती देणेस शिफारस आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव |
|---|---|
| 1. | श्री.चेतन म्हात्रे |

## विभागीय पदोन्नती निवड समितीचा निर्णय :-

सदर प्रस्तावाचे वाचन करुन समितीने खालील अटीशर्तीच्या अधिन राहुन परिशिष्ट "अ" मधील खालील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) (वर्ग-03) यांना शाखा अभियंता (स्थापत्य) (वर्ग-02) या पदावर निव्वळ तात्पुरत्या पदोन्नती देणेकरीता निर्णय घेण्यात आला.

1. विचारक्षेत्रातील खालील कनिष्ठ अभियंता कर्मचारी यांनी मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम-2019 नुसार शाखा अभियंता (स्थापत्य) या पदावर पदोन्नती देण्यासाठी कनिष्ठ अभियंता या पदाचा 03 वर्षाचा अनुभव धारण केलेला आहे तसेच विभागीय परिक्षा उत्तीर्ण होणेमधुन सुट देण्यात आली आहे. परंतू खालील कनिष्ठ अभियंता कर्मचारी यांचेविरुध्द विभागीय चौकशी सुरु/सद्यस्थितीत निलंबीत/ मा.न्यायालयात प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामुळे त्यांची नावे दि.01/08/2019 रोजीच्या शासन निर्णयानुसार मोहोरबंद पाकीटात ठेवणेस शिफारस आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | विभागीय चौकशीबाबत माहिती |
|---|---|---|
| 1. | श्री. शैलेश शिंदे | मा.न्यायालयात लाचलुचपत प्रकरणी कार्यवाही चालु असून सद्यस्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. |
| 2. | श्री.यशवंतराव देशमुख | निलंबीत |
| 3. | श्री.श्रीकृष्ण मोहिते | निलंबीत |
| 4. | श्री. दिपक विठ्ठल जाधव | श्री. दिपक जाधव यांच्या नेमणूकीबाबत मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे स्पेशल लिव्ह क्र.21955/2012 दाखल केलेले आहे. सद्यस्थितीत सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. |

2. तसेच विचारक्षेत्रातील कनिष्ठ अभियंता कर्मचाऱ्यांपैकी खालील कनिष्ठ अभियंता हे पदोन्नतीसाठी पात्र असून, केवळ एतदर्थ मंडळाच्या हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण नसल्यामुळे त्यांना हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासुन सुट दिलेली नाही. त्यामुळे खालील कनिष्ठ अभियंता यांचेकरीता पदोन्नतीसाठी पद राखुन ठेवुन प्रकरण खुले ठेवण्यात यावे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | शेरा |
|---|---|---|
| 1. | श्री. सचिन पवार | |

3. सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्रमांक :- बीसीसी-2018/प्र.क्र.366/16-ब, दि.07 मे, 2021 अन्वये मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र.2797/2015 या प्रकरणी दिनांक 04/08/2017 रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने व मा. सर्वोच्च न्यायालयाने मा. उच्च न्यायालयाच्या या निर्णयास अद्याप स्थागिती दिलेली नसल्याने पदोन्नतीच्या कोट्यातील सर्व रिक्त पदे दि.25/05/2004 च्या स्थितीनुसार सेवा ज्येष्ठतेने भरण्याबाबत निर्देश आहेत. त्याअनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील शाखा अभियंता (स्थापत्य) या पदाची 06 रिक्त पदे पदोन्नतीने भरावयाची असल्यामुळे खालील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) यांनी शाखा अभियंता (स्थापत्य) या पदावर पदोन्नती देण्यासाठी कनिष्ठ अभियंता या पदाचा 03 वर्षाचा अनुभव धारण केलेला आहे व व्यवसायिक परीक्षा उत्तीर्ण होण्यापासुन सुट देण्यात आली आहे. त्यामुळे रिक्त 06 पदांपैकी 01 पदावर खालील कनिष्ठ अभियंता

(स्थापत्य) यांना मा.महासभा मान्यतेच्या अधिन राहून व मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.28306/2017 च्या अधिन राहुन निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात शाखा अभियंता (स्थापत्य) या पदावर पदोन्नती देणेस निवड करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव |
|---|---|
| 1. | श्री.चेतन म्हात्रे |

4. सदर पदोन्नती मा. महासभेच्या मान्यतेच्या अधिन राहून देण्यात येत आहे.
5. सदर कर्मचारी यांची शैक्षणिक पात्रतेची कागदपत्रे पडताळणीच्या तसेच सेवा व वेतन पडताळणीच्या अधिन राहुन लाभ मंजुर करण्यात येत आहे. वेतन निश्चितीनंतर वेतन पडताळणी पथकाकडुन त्याची पडताळणी करुन घेणेत यावी.
6. सदर कर्मचाऱ्याला पदोन्नतीच्या अटीशर्ती मान्य असल्याबाबतचे हमीपत्र घेण्यात यावे.
7. कोणत्याही मा.न्यायालयाचा निर्णय संबंधीत अधिकारी यांचेवर बंधनकारक राहील.
8. सदर कर्मचाऱ्यांना मा.सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्र.28306/2017 वरील अंतिम निर्णयाच्या अधिन राहून सेवाजेष्ठतेनुसार खुल्या प्रवर्गातून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देणेबाबत पदोन्नती समिती शिफारस करीत आहे.

(मारुती गायकवाड)
उपायुक्त (मुख्यालय) तथा सदस्य सचिव
विभागीय पदोन्नती निवड समिती

(दिपक खांबीत)
कार्यकारी अभियंता तथा मागासवर्गीय प्रतिनिधी
विभागीय पदोन्नती निवड समिती

(मंजिरी डिमेलो)
प्र.मुख्यलेखापरीक्षक तथा सदस्य
विभागीय पदोन्नती निवड समिती

(दिलीप ढोले)
आयुक्त तथा अध्यक्ष
विभागीय पदोन्नती निवड समिती